“ वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संर्वधन ” संरक्षित क्षेत्राचे (Protected Area) संरक्षणाकरिता नागपूर, नाशिक व मुंबई या वन्यजीव वृत्ताकरिता वनरक्षकांची १०० पदांना सन २०१७-१८ मध्ये पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : - डब्ल्यूएलपी ०२.१७ /प्र.क्र.५५ /फ-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २५ ऑक्टोंबर, २०१७

वाचावे :-

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र कक्ष-३/योजनेतर/ प्र.क्र. ४९/१६-१७/२०८५९, दिनांक :- ०२.०२.२०१७
२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :- पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क दि. १०.०२.२०१७.
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक : - डब्ल्यूएलपी ०.१७ /प्र.क्र.५५ /फ-१, दिनांक २८.०२.२०१७.
४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:- पदनि- २०१६/ प्र.क्र.०८/ आ.पु.क., दिनांक :- ०३.१०.२०१७.

प्रस्तावना :-

“ वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संर्वधन ” संरक्षित क्षेत्राचे (Protected Area) संरक्षणाकरिता नागपूर, नाशिक व मुंबई या वन्यजीव वृत्ताकरिता वनरक्षकांची १०० अस्थायी पदांना सन २०१७-१८ मध्ये दिनांक ०१.०४.२०१७ ते दिनांक २८.०२.२०१८ पर्यत चालू ठेवण्याचा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयानुसार प्रशाकिय विभागास प्रदान केलेल्या अधिकारात संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ मध्ये दिनांक ०१.०४.२०१७ ते दिनांक ३०.०९.२०१७ पर्यत मुदत वाढ देण्यात आली आहे.

आता संदर्भ क्रमांक ४ च्या वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.१०.२०१७ ते दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

शासन निर्णय :-

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये “ वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संर्वधन ” संरक्षित क्षेत्राचे (Protected Area) संरक्षणाकरिता नागपूर, नाशिक व मुंबई या वन्यजीव वृत्ताकरिता वनरक्षकांची १०० अस्थायी पदांना सन २०१७-१८ मध्ये दिनांक ०१.०४.२०१७ ते दिनांक २८.०२.२०१८ पर्यत चालू ठेवण्याकरीता सादर केलेल्या

प्रस्तावास अनुसरुन वित्त विभागाच्या संदर्भ ४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये " वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संर्वधन " संरक्षित क्षेत्राचे (Protected Area) संरक्षणाकरिता नागपूर, नाशिक व मुंबई या वन्यजीव वृत्ताकरिता वनरक्षकांची १०० अस्थायी पदांना सन २०१७-१८ मध्ये दिनांक ०१.१०.२०१७ ते दिनांक ३१.१२.२०१७ पर्यत मूदतवाढ देण्यात येत आहे.

" वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संर्वधन " संरक्षित क्षेत्राचे (Protected Area) संरक्षणाकरिता नागपूर, नाशिक व मुंबई या वन्यजीव वृत्ताकरिता वनरक्षकांची १०० अस्थायी पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च२४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेतर), ०२ पर्यावरणात्मक वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवन, ११० (एक) निसर्ग संवर्धन व वन्यपशू संरक्षण (२४०६ ०७६६) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. असंक - १००४ / प्र.क्र.१२ /(भाग-२) /२००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ०४.१०.२००४ व क्रमांक:- पदनि- २०१६/ प्र.क्र.०८/ आ.पु.क., दिनांक :- ०३.१०.२०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२६१२५५४०२७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2017.10.26 12:45:26 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मंबई/नागपूर.
५. वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक
६. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई - ३२,
७. फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

*****

शासन निर्णय क्रमांक : डब्ल्यूएलपी ०२.१७/प्र.क्र.५५/फ-१ दिनांक:- २५ ऑक्टोंबर, २०१७ सोबतचे विवरणपत्र

(दिनांक :- .०१.१०.२०१७ ते दिनांक :- ३१.१२.२०१७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली वनरक्षक संवर्गातील पदे)

वन्यजीव वृत्त	**वन्यजीव विभाग**	**राष्ट्रीय उद्यान/अभयारण्याचे नाव**	**पद संख्या**
१	२	३	४
नागपूर	पेंच नागपूर	पेंच राष्ट्रीय उद्यान	**५**
	गोंदिया	नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान	**८**
		नागझिरा अभयारण्य	**५**
	पांढरकवडा	पैनगंगा अभयारण्य	**११**
मुंबई	नाशिक	यावल अभयारण्य	**६**
		संरक्षण पथक (यावल)	**२**
		तपासणी नाके (यावल)	**६**
	औरंगाबाद	गौताळा औट्रमघाट अभयारण्य	**६**
	ठाणे	तानसा अभयारण्य	**१८**
	कोल्हापूर	चांदोली राष्ट्रीय उद्यान व सागरेश्वर अभयारण्य	**१३**
		राधानगरी अभयारण्य	**४**
		कोयना अभयारण्य	**७**
	पुणे	भिमाशंकर अभयारण्य	**९**
एकूण पदे			१००

****